# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## परिपत्रक

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

जा.क्र.सीडीओई/७७ दि. 25 FEB 2026

विषय : - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम ६०:४० पॅटर्ननुसार परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा गुणांचे ७०:३० पॅटर्न प्रमाणे निकाल जाहीर झालेबाबत.

संदर्भ : अभ्यासमंडळे विभागाचे दि.०८.०५.२०२५ रोजीचे पत्र.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षापासून ६०:४० पॅटर्न लागू करण्याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासकमास प्रथम वर्षापासून प्रवेशित विद्यार्थ्यांना ६०:४० पॅटर्न लागू राहील. दूरशिक्षण व ऑनलाईन परीक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ६०:४० पॅटर्न पध्दतीने होईल आणि त्यांच्या गुणांचे रुपांतर ७०:३० मध्ये करण्यात येईल असे उपरोक्त संदर्भानुसार अभ्यासमंडळे विभागाने कळविले होते. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सर्व नियमित व दूरशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमांना ६०:४० मूल्यांकन पद्धती लागू करणेत आली आहे.

दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राअंतर्गत सुरू असलेल्या अभ्यासक्रमांना ७०:३० असे रूपांतर करणेस अभ्यासमंडळे विभागाने कळविलेनुसार नियमित विद्यार्थ्यांचे ६०:४० मूल्यांकन पद्धतीनुसार यापूर्वी निकाल जाहिर झाले आहेत. या केंद्राकडील प्रथम वर्षासाठी ६०:४० पॅटर्ननुसार परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे ७०:३० पॅटर्ननुसार रूपांतरीत केलेल्या गुणांनुसार निकाल जाहिर झालेले आहेत. द्वितीय व तृतीय वर्षाचे ८०:२० पॅटर्ननुसार निकाल जाहिर झालेले आहेत. त्यानुसार आपल्या केंद्रावरील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ६०:४० पॅटर्ननुसार परीक्षा दिलेली असूल ते ७०:३० पॅटर्ननुसार रूपांतरीत करून आपल्या गुणांचे निकाल जाहिर झालेले आहेत. याबाबत सदरची माहिती अवगत करून मार्गदर्शन करावे. तसेच या केंद्राचे परिपत्रक व संदर्भिय परिपत्रके आपल्या केंद्राच्या सूचनाफलकावर/ऑनलाईन नोटीसवर प्रसिध्द करावे.

Bhinde
उपकुलसचिव

प्रति,

सर्व केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

प्रत : -

१. मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
२. उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
३. सहाय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
४. कक्ष अधिकारी/ऑफीस सुपरवायझर कम डाटा एन्ट्री प्रोसेसेर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
५. सर्व संबधित समन्वयक व हंगामी सहाय्यक प्राध्यापक : - आवश्यक व योग्य त्या कार्यवाहीस्तव
६. सर्व संबंधित प्रवेश व प्रशासकीय विभागातील सेवक : - आवश्यक व योग्य त्या कार्यवाहीस्त
७. संगणक चालक